| MHBI140004412020 | |
|---|---|
| | दाखल दिनांक : ०२ / ०३ / २०२०<br>नोंदणी दिनांक : ०२ / ०३ / २०२०<br>निकाल दिनांक : ०२ / ०५ / २०२६<br>कालावधी : व. ०६ म. ०२ दिवस ०० |

**'अ'**

## आष्टी येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (कोर्ट क्र.३)
### ता.आष्टी, जि.बीड यांचे न्यायालयात
### (पिठासीन अधिकारी : महेश आर. बडाख)
(न्यायनिर्णय : दिनांक ०२/०५/२०२६)

**नियमित फौजदारी खटला क्र.४०/२०२०** **निशाणी क्र.६५/ब.**

प्रथम खबर अहवाल तपशील
गुन्हा नोंद क्र. : ३३३/२०१९
पोलीस ठाणे : आष्टी, ता.आष्टी, जि.बीड.

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस ठाणे आष्टी, ता.आष्टी, जि.बीड. |
| सरकारी अभियोक्ता | **श्री.व्ही.एस.गव्हाळे./ श्री. व्ही.एम. दारुणकर** |
| **आरोपी** | १. **सचिन पोपट लोंढे,** वय : २८ वर्षे, |
| | २. **शोभा पोपट लोंढे,** वय : ५५ वर्षे,<br>आ.क्र. १ व २ रा. दैठणा ता. आष्टी जि. बीड |
| | ३. **जयश्री दिनकर गजघाट,** वय : ५० वर्षे, |
| | ४. **दिनकर नाना गजघाट,** वय : ४३ वर्षे,<br>आ.क्र. ३ व ४ रा.नांदा, ता. आष्टी जि. बीड. |
| आरोपींचे विधीज्ञ | **श्री.पी.बी. पारखे.** |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १५/०१/२०१७ – १३/०६/२०१९ |
| प्रथम खबर अहवाल | ०३/१२/२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०२/०३/२०२० |
| दोषारोप निश्चीती दिनांक | २२/११/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १०/०४/२०२६ |
| निकाल राखुन ठेवल्याचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णय दिनांक | ०२/०५/२०२६ |
| शिक्षा सुनावल्याचा कालावधी लागु असल्यास | --- |

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीन वर मुक्त झाल्याचा दिनांक | दोषारोपाचे कलम | आरोपीस शिक्षा किंवा निर्दोष मुक्त केले. | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ प्रमाणे कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | सचिन पोपट लोंढे | – | – | भा.दं.वि. चे कलम ४९८(अ) | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| २) | शोभा पोपट लोंढे | – | – | भा.दं.वि. चे कलम ४९८(अ) | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| ३) | जयश्री दिनकर गजघाट | – | – | भा.दं.वि. चे कलम ४९८(अ) | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| ४) | दिनकर नाना गजघाट | – | – | भा.दं.वि. चे कलम ४९८(अ) | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |

## भाग 'क'

## अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | निशाणी क्र. | साक्षी प्रकार |
|---|---|---|---|
| १) | श्वेता सचिन लोंढे | ६० | फिर्यादी |
| २) | किशोर उत्तम शिंदे | ६१ | फिर्यादीचे वडील |

## आरोपीतर्फे साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेल्या निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

## न्यायालयातर्फे देण्यात आलेले निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

## मुद्देमालाचा तपशील

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## न्यायनिर्णय

## (दिनांक ०२/०५/२०२६)

आरोपी क्र. १ ते ४ विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम

४९८(अ) खालील शिक्षापात्र अपराधासाठी खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे कथन खालीलप्रमाणे–**

**२.** फिर्यादी श्वेता सचिन लोंढे हिने फिर्याद दिली की, दि. १०/०७/२०१६ रोजी आरोपी क्र. १ सोबत तिचा विवाह झाला. विवाहानंतर आरोपींनी तिला ६ महिने चांगले नांदवले. त्यानंतर आरोपी क्र.१ तिला संशय घेऊन उपाशीपोटी ठेवुन मारहाण करत. तसेच आरोपी माहेरुन दर महिन्याला गाडीचा हफ्ता भरण्यासाठी ४ हजार रुपये घेऊन ये असे म्हणुन शाररिक व मानसिक त्रास देत. दि. ११/०४/२०१९ रोजी घडलेला प्रकार माहेरी सांगितला असता, त्यांनी आरोपींना समजावण्याचा प्रयत्न केला परंतु आरोपींनी ऐकले नाही. दि. १३/०६/२०१९ रोजी तक्रार निवारण केंद्रामध्ये तडजोडीचा प्रयत्न केला परंतु तडजोड झाली नाही. सबब, आरोपींनी शाररिक व मानसिक त्रास दिल्यामुळे सबब प्रस्तुतची फिर्याद दिली.

**३.** सदरील फिर्यादवरुन पोलीस ठाणे आष्टी येथे गु.र.क्र. ३३३/२०१९ नोंदविण्यात आला. प्रस्तुत गुन्हयाचा तपास, तपास अधिकारी ए.एम. सुबरे, पोलिस ठाणे आष्टी यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे तपासटिपण नोंदवले व इतर कागदोपत्री पुरावा हस्तगत केला. तपासाअंती आरोपींविरुध्द गुन्हा निष्पन्न झाल्याने न्यायालयात दोषारोपपत्र/अंतीम अहवाल दाखल केला.

**४.** आरोपी क्र.१ ते ४ यांचे वर भारतीय दंड विधानाचे कलम ४९८(अ) अन्वये दोषारोप (निशाणी क्र.२३) निश्चित करण्यात आला. आरोपींनी त्यांचे निवेदन

(नि.क्र.२४ ते २७) अन्वये गुन्हा नाकबुल करुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

**५.** अभियोगपक्षाचा पुरावा नोंदविण्यात आला. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ अन्वये आरोपींचे विरुध्द अपायकारक पुरावा अभिलेखावर न आल्याने आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**६.** अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता व आरोपी तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

**७.** या सर्व बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष त्याखाली नमुद कारणांकरीता नोंदविले आहेत :

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपी यांनी समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ संगनमत करुन फिर्यादी हिस गाडीचा हफ्ता भरण्यासाठी दर महिन्याला ४ हजार रुपयाची मागणी करुन तिचा शारिरीक व मानसिक छळ करुन क्रुर वागणुक दिली ? | नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

:: **<u>का र ण मि मां सा</u>** ::

**<u>मुद्दे क्र.१ करीता</u>** :

**८.** मुद्दा क्र.१ एकमेकांशी संलग्न असलेने त्यांची कारणे एकत्र नोंदविण्यात येत आहेत. अभियोग पक्षाने आरोपींच्या विरूद्ध गुन्हा सिद्ध करण्याकरीता वर भाग

'क' मध्ये नमुद केल्याप्रमाणे केवळ दोन साक्षीदारांना तपासले आहे.

९. आरोपींच्या विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने आरोपी यांनी समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ संगनमत करुन फिर्यादी हिस गाडीचा हफ्ता भरण्यासाठी दरमहा ४ हजार रुपयाची मागणी करुन तिचा शारिरीक व मानसिक छळ करुन क्रुर वागणुक दिली हे सिध्द करणे गरजेचे आहे. तसेच, त्यांनी फिर्यादीस लाथाबुक्क्याने मारहाण करुन शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली हे देखील अभियोग पक्षाने संशयापलीकडे सिध्द करणे गरजेचे आहे.

१०. अभियोग पक्षाने गुन्हा शाबीत करण्यासाठी फिर्यादी – श्वेता सचिन लोंढे (साक्षीदार क्र.१) व फिर्यादीचे वडील किशोर उत्तम शिंदे (साक्षीदार क्र.२) यांना तपासले आहे. अ.सा.क्र.१ फिर्यादी हिने तिच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, तिचे लग्न दिनांक १०/०७/२०१६ रोजी आरोपी क्र.१ सोबत झाल्यानंतर ती तिच्या सासरी नांदण्यास गेली असता त्यांचे आपसात विचार जुळत नव्हते व त्यामुळे किरकोळ भांडण होत होते. आरोपींनी तिला मारहाण करुन शारिरीक व मानसिक त्रास दिला का कसे हे तिला आठवत नाही. तिच्यात व आरोपीमध्ये शुल्लक कारणांवरुन वाद झाले होते. घटनेबाबत तिला आठवत नाही. तसेच, अ.सा.क्र.२ यांनी देखील त्यांच्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, आरोपींनी अ.सा.क्र.१ फिर्यादी हिला त्रास दिल्याबाबत त्यांना आठवत नाही. सदरील दोन्ही साक्षीदार अभियोगपक्षाला सहाय्य करित नसल्याने त्यांना अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ चे कलम १५४ प्रमाणे उलटतपास सदृश प्रश्न विचारण्यात आले. परंतु त्यातुन देखील अभियोगपक्ष

आरोपींविरुध्द कोणतीही अपायकारक बाब अभिलेखावर आणण्यास अपयशी ठरला आहे.

**११.** अभिलेखाचे अवलोकन केले असता आरोपींची व फिर्यादीची आपसांत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे दिसते. प्रस्तुत प्रकरणात तडजोड झाल्याने अभियोगपक्षाने फिर्यादी व तिचे वडीलां व्यतिरीक्त इतर साक्षीदार तपासलेले नाहीत. तसेच फिर्यादीने निशाणी ६३ वर पुरसीस देवुन यापुढे लेखी किंवा तोंडी पुरावा दयायचा नाही असे कथन केले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आरोपी व फिर्यादीची तडजोड झालेने फिर्यादीने अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही. फिर्यादी व तिच्या वडीलां व्यतिरिक्त इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासला नसल्यामुळे तसेच मुख्य साक्षीदार फितूर झालेने गुन्हा आरोपींनी केला असे म्हणता येणार नाही.

**१२.** प्राप्त परिस्थितीत उपलब्ध पुराव्याचे एकंदर अवलोकन केले असता आरोपींविरुध्द गुन्हयामध्ये गोवण्याइतपत कुठलीही बाब न्यायालयासमोर आलेली नाही. तसेच उभय पक्षांमध्ये न्यायालयाबाहेर झालेल्या तडजोडीमुळेच फिर्यादीने अभियोगपक्षाच्या प्रकरणाशी सुसंगत साक्ष दिली नसल्याचे देखील यापुर्वीच स्पष्ट झाले आहे. सदर तडजोडीमुळे आरोपी यांनी संगणमत करुन फिर्यादीस गाडीचा हफ्ता भरण्यासाठी दरमहा ४ हजार रुपयांची मागणी करुन तिचा शारिरीक व मानसिक छळ करुन क्रुर वागणुक दिली व त्याअन्वये भा.दं.वि. कलम ४९८–अ प्रमाणे गुन्हा केला तसेच फिर्यादीस मारहाण करुन शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली हे सिध्द होत नाही. अभियोगपक्षाला भा.दं.वि., १८६० चे कलम

४९८(अ) चे आवश्यक घटक सिध्द करण्यात पुर्णपणे अपयश आल्याचे दिसुन येते. सबब, मुद्दा क्रं.१ चे निष्कर्ष “नकारार्थी“ नोंदविले आहेत.

<u>मुद्दा क्र.२ साठी</u>:–

**१३.** मुद्दे क्र. १ चा निष्कर्ष पाहता, अभियोगपक्ष आरोपी यांचेविरुध्द आरोप शाबीत करण्यास अपयशी ठरले आहेत. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. आरोपी क्र. ३ व ४ आज रोजी हजर नाहीत. सबब फौ.प्र.सं. कलम ३५३–६ अन्वये आरोपी हे निर्दोष मुक्त पात्र असल्याने त्यांच्या गैरहजरीत न्यायनिर्णय देण्यात येतो. अभिलेखावर मुद्देमाल नाही, सबब त्याबाबत आदेश नाही. करीता, मुद्दा क्र.२ च्या उत्तरात खालीलप्रमाणे आदेश पारीत केले आहेत :–

:: **आदेश** ::

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ ते ४ यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४९८(अ) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपींचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येतात. |
| ३. | आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७(अ) प्रमाणे प्रत्येकी रुपये १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व एक जामीनदार द्यावा. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर) |

MAHESH RAMCHANDRA BADAKH
Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.05.02 17:19:28 +0530

( महेश आर. बडाख )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), आष्टी

ठिकाण – आष्टी
दिनांक – ०२/०५/२०२६

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment / order"

Dictated on : 02/05/2026
Transcribed on : 02/05/2026
Checked & signed on : 02/05/2026

**Sd/-**
Rahul S. Abnave,
(Jr. Clerk)